# वसतिगृह चळवळी पाठीमागील छत्रपती शाहू महाराजांची भूमिका

**श्री.संदिप वसंतराव जाधव,** पीएच.डी. संशोधक विद्यार्थी, इतिहास अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, sandipjadhav3043@gmail.com

---

**प्रस्तावना**

करवीर राज्याचे प्रमुख म्हणून छत्रपती शाहू महाराजांचा राज्यारोहण समारंभ दि. २ एप्रिल १८९४ रोजी मुंबईचे इलाख्याचे गव्हर्नर लॉर्ड हॅरीस यांच्या उपस्थितीत पार पडला.[१] राज्यकारभाराची सूत्रे हाती आल्यानंतर महाराजांनी लगेचच आपल्या दैनंदिन कामकाजास सुरुवात केली आणि वर्षभरातच आपल्या संस्थानातील शिरोळ आणि पन्हाळा पेट्याला भेट दिली.[२] हे कामकाज पहात असताना त्यांच्या असे लक्षात आले की, कोल्हापूर संस्थानच्या प्रशासनात व शिक्षण क्षेत्रामध्ये ब्राह्मण वर्गाचे प्राबल्य अधिक आहे. संस्थानात व संस्थानाबाहेर केलेल्या दौऱ्यांमध्ये त्यांनी जनतेचे प्रश्न जवळून पाहिले होते. शेतीशी संबंधित, व्यापार, आरोग्य, शिक्षण अशा विविध क्षेत्रांचे अनेक प्रश्न त्यांच्यासमोर उभे होते. या सर्व प्रश्नांचा बारकाईने अभ्यास करताना त्यांच्या असे लक्षात आले की, जनतेच्या प्रश्नांमागील मूळ कारण म्हणजे शिक्षणाचा अभाव होय आणि तो काळही तसाच होता. जातीयतेचा पगडा समाजावर मोठ्या प्रमाणावर होता. आपली पारंपारिक पद्धतीने चालत आलेली कामे करणे हेच आपले कर्तव्य आहे असे बहुजन वर्ग समजत होता, आणि नेमका त्यांच्या याच अज्ञानीपणाचा फायदा संस्थानातील अधिकारी वर्ग घेत होता.

महाराजांनी राज्यसूत्रे हाती घेतली तेव्हा कोल्हापूर संस्थानच्या सेवेमध्ये साठ ब्राह्मण तर अकरा ब्राह्मणेतर अधिकारी होते आणि हे प्रमाण प्रचंड प्रमाणात व्यस्त प्रमाण होते. संस्थानच्या एकूण लोकसंख्येपैकी ७९.१% ब्राह्मण शिकलेले होते तर मराठा ८.६%, कुणबी १.५%, मुसलमान ७.५% आणि जैन व लिंगायत मिळून १०.१% शिकलेले होते.[३] या आकडेवारीवरून हे लक्षात येते कि, बहुसंख्य प्रजा ही अज्ञानी, निरक्षर होती.

**सर्वजातीसमावेशक वसतिगृहाचा प्रयोग -**

ब्राह्मणेतरांना संधी दिल्याशिवाय त्यांची परिस्थिती सुधारणार नाही याची जाणीव त्यांना होती. अशी संधी त्यांना द्यायची असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही अशी त्यांची धारणा होती. यादृष्टीने प्रयत्न करण्यासाठी त्यांनी बहुजन समाजाला शिक्षणाची दारे खुली करण्याचा एक मार्ग म्हणून सन १८९६ साली सर्व जाती जमातीच्या मुलांकरिता एक वसतिगृह सुरू केले. या वसतिगृहाची जबाबदारी न्यायमूर्ती श्री. व्ही.बी. गोखले यांच्याकडे सोपवण्यात आली.[४]

वसतिगृह सुरू करण्यास कारणही तसेच घडले. सन १८९७ साली मुंबई इलाख्यामध्ये फार मोठा दुष्काळ पडला या दुष्काळी परिस्थितीमुळे परगावाहून किंवा कोल्हापूरच्या ग्रामीण भागातून कोल्हापूरमध्ये शिक्षणासाठी येऊन राहणे सर्वसामान्य विद्यार्थ्यांना परवडेनासे झाले, कारण तेथील खानावळींचे दर हे पाच रुपयांवरून सात रुपयांवर गेले होते. या सर्वांवर उपाय म्हणून शाहू महाराजांनी एक नवीन वसतिगृह स्थापन करण्याचा निर्णय घेतला. या वसतिगृहात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याला आपल्या जेवणाच्या खर्चासाठी दरमहा फक्त दोन रुपये खर्च करावे लागणार होते. त्याहून अधिकचा खर्च करवीर दरबार तर्फे केला जाणार होता. ही सर्व व्यवस्था पाहण्यासाठी दरबारने अगोदरच आपले एक अधिकारी न्यायमूर्ती श्री.व्ही.बी.गोखले यांची नेमणूक केलेलीच होती.

या सर्वजातीसमावेशक वसतिगृहाच्या निर्मितीची माहिती १८९६-९७ सालच्या कोल्हापूर राज्याच्या वार्षिक अहवालामध्ये पुढील प्रमाणे दिलेली आहे,

"As the Scarcity began to prevail in Kolhapur the charges in the hotels soon rose from Rs.5 to 7 and so it was considered that parents in ordinary circumstances would find it difficult to pay them and keep their sons for learning in the High School and College.To give them some sort of relief,a Boarding house has been established and the monthly charges have been fixed at Rs.5.per head.The Darbar guaranteeing to pay the excess not exceeding Rs.2.per head.The management of this concern is made over to a committee, specially appointed with Rao Saheb V.B.Gokhale, Assistant Judge, Kolhapur for its President.The number of free student-ships in the High School and College,has also been increased to afford relief to poor students.[५]

थोडक्यात राज्याच्या खजिन्यावर ताण पडला तरी चालेल पण कसल्याही नैसर्गिक आपत्तीमुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबू नये. असे राजांना वाटत होते म्हणून ते शक्य होतील तितके प्रयत्न करीत होते.

सर्वजातीसमावेशक वसतिगृह जवळपास १९११ सालापर्यंत चालले. पण त्यानंतर महाराजांनी ते बंद केले, कारण या वसतिगृहामध्ये ब्राम्हणेतर मुलांना अपमानास्पद वागणूक मिळू लागली आणि तिथे जातीपातीची कडक बंधने पाळावी लागत होती.[६] ज्या बहुजनांच्या शिक्षणासाठी महाराजांनी हा प्रयोग चालू केलेला होता. तो या वसतिगृहामुळे फारसा फलद्रूप झाला नाही. तिथे मिळणाऱ्या अपमानास्पद वागणुकीमुळे ब्राह्मणेतर विद्यार्थी ते वसतिगृह सोडून जाऊ लागले, त्यामुळे या वसतिगृहात गेल्या दहा वर्षात एकही ब्राह्मणेतर विद्यार्थी शिकलेला आढळून न आल्यामुळे सन १९११ रोजी महाराजांनी हे सर्वसमावेशक वसतिगृह बंद करण्याचा निर्णय घेतला आणि आपण हा निर्णय कशाच्या आधारे घेतला आहे. याची हकीकत त्यांनी सर डब्ल्यू. टी. मॉरीसन यांना दिनांक १३ एप्रिल १९११ च्या पत्राद्वारे कळविली. त्या पत्रात महाराज म्हणतात,

" Since I came down here I have dispersed the Boarding Institution which was supposed to be for all classes as I found that there was no Non-Brahmin in it for nearly ten years.I have distributed the sum among Maratha Boarding Institution, Lingayats, Jains, Mahomedans, Tailors, Mahars, Prabhus, Senoys. I wish to have another Boarding House for Goldsmiths."[७]

शाहू महाराज हे वसतिगृह फक्त बंद करुनच थांबले नाहीत, तर त्या वसतिगृहासाठी ज्या निधीची तरतूद केलेली होती. ती इतर जातीच्या वसतिगृहांच्या वाढीसाठी देऊन टाकली. निवासी शिक्षणाचा आणखी एक प्रयोग महाराजांनी सन १९०० साली केलेला होता. परंतु विद्यार्थ्यांच्या आळशीपणामुळे व इतर कारणांमुळे हि व्यवस्थाही त्यांना बंद करावी लागली.[८]

**जातवार वसतिगृह निर्मितीमागील भूमिका -**

बहुजन समाज शिक्षित करण्याचे व्रत स्वीकारलेल्या शाहू छत्रपतींनी या अनुभवांनी डगमगून न जाता यावर उपाय म्हणून मग 'जातवार' वसतिगृहे स्थापन करण्याचे ठरविले. महाराजांनी जातवार वसतिगृहे स्थापन करण्यास सुरुवात केल्यावर त्यांच्यावर चौफेर टीका सुरू झाली.'मराठा' या लोकमान्य टिळकांच्या वृत्तपत्राने दि ९ ऑक्टोबर १९०१ रोजी महाराजांवर याविषयी टिका करताना म्हटले कि, "कुठल्याही संस्थानचा राज्यकर्ता एखाद्या विशिष्ट जातीचा पक्षपाती असू नये,किंवा कुठल्याही संकुचित पूर्वग्रहाने त्याचा दृष्टिकोन दूषित असू नये, असे शिवाजी महाराज वागत होते. त्याचे सत्यस्वरूप शिवाजी महाराजांच्या अमोल उदाहरणात सापडते ते असे की, त्यांना जेथे जेथे गुणवत्ता दिसली तेथे तेथे त्यांनी सक्रिय उत्तेजनच दिले आणि आपल्या अलौकिक चातुर्याने विविध जातींचा एकोपा करून एक राष्ट्र निर्माण केले." [९] तसेच 'समर्थ' या पत्राने राजाराम कॉलेजमधील विद्यार्थ्यांवर या जातवार वसतिगृह योजनेमुळे अन्याय होईल अशी टीका केली. [१०]

वास्तविक: महाराज हे जातीभेदाच्या पूर्णपणे विरोधात होते पण त्यांना शिक्षण क्षेत्रातील विशिष्ट समाजाची, धनदांडग्यांची मक्तेदारी मोडून काढून सर्वसामान्यांना शिक्षण द्यावयाचे होते. दुष्काळी परिस्थितीमुळे खेड्यापाड्यातील गोरगरीब जनता आपल्या मुलांना शिकवणार नाही, त्यांच्या शिक्षणाचा आर्थिक भार त्यांना पेलवणार नाही म्हणून महाराजांनी एक सर्वसमावेशक वसतिगृह सुरुवातीला चालू केले होतेच. पण तिथेही उच्चवर्णीयांची अरेरावी, मानसिक त्रास बहुजन वर्गातील मुलांना व्हायला लागल्यामुळे मुले ते वसतिगृह सोडून जाऊ लागली. एकीकडे पारंपारिक गरिबी तर दुसरीकडे जातीव्यवस्थेखाली दबला गेलेला समाज यामध्ये समन्वय साधून महाराजांना काम करावयाचे होते. येनकेनप्रकारे बहुजनांच्या शिक्षणाची सोय करणे त्यांना आवश्यक वाटत होते.

खरे तर शिक्षण प्रसारामधूनच त्यांना जातीभेद मोडून काढावयाचा होता. आपण जातिभेदाच्या कसे विरोधी आहोत, याविषयीची मते त्यांनी दिनांक १५ ऑगस्ट १९२० रोजीच्या कोल्हापुरातील 'श्री राजाराम इंडस्ट्रियल स्कूल'च्या आधुनिक साधनांच्या प्रदर्शनावेळी मांडलेली आहेत. यावेळी महाराज म्हणतात,

"जातीभेद हा हिंदुस्थानास फार मोठा रोग आहे, असे मी याप्रसंगी स्पष्ट बोलून दाखविले आहे. जातीभेद मोडण्याचे माझे प्रयत्न सतत चालू आहेत. असे असतानाही मी आपल्यासारख्या जाती विशिष्ट प्रयत्नास मदत देतो, हे माझे वर्तन माझ्या बोलण्याची विसंगत आहे असे कोणीही म्हणेल, तेव्हा या संबंधाने चार शब्द सांगणे गैर नाही. काही पर्यायापर्यंत जातीभेद व जात्यभिमान सुटत नाही. मनुष्य आपल्या मुलाबाळांची विशेष काळजी घेतो. हे त्यांचे करणे गैर असे कोणी म्हणणार नाही. परंतु ज्याला आपल्या सबंध आयुष्यात आपल्या मुलाबाळांच्या हितापलीकडे काही दिसत नाही त्याला कोणीही दोष देईल. ज्या समाजात आपण वाढलो, त्या समाजाची उन्नती करण्याची काळजी वाटणे हे योग्य आहे. पण त्या

समाजाच्याबाहेर एक मोठा- फारच मोठा समाज आहे. त्याचीही सेवा आपणास केली पाहिजे याची जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे. म्हणून जातीचा अभिमान अगदी मर्यादित असावा. आपण हिंदू आहोत. देशाची उन्नती करण्याची जबाबदारी आपणावर ही आहे याची विस्मृती होऊ देता कामा नये. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे, जात्यभिमान हा राष्ट्रकार्यास पोषक असावा राष्ट्रसेवा नजरेआड करणारा नसावा." [११]

याठिकाणी महाराज स्पष्टपणे म्हणतात कि, माझी उक्ती आणि कृती ही विसंगत आहे, असे कुणीही म्हणेल पण प्रत्येकाचा स्वजातीअभिमान हा आपल्या मुलाबाळांच्या स्वार्थापुरता मर्यादित असू नये. असला तर तो जातीअभिमान राष्ट्रकार्यासाठी पोषक असावा. मुलाबाळांची काळजी घ्यावी, त्याचबरोबर आपल्या राष्ट्राकडेही दुर्लक्ष करु नये. टिकाकारांचा रोख महाराजांनी जातवार वसतिगृहे स्थापन करुन जातीयवादाला प्रोत्साहन दिले आहे असा होता. पण आपल्या कृतीचे समर्थन करताना आपला जातवाद हा राष्ट्रकार्याला पोषक,राष्ट्राच हित जपणारा जातवाद असल्याचे ते प्रतिपादन करतात.

तत्कालीन समाजात जे उच्च होते त्यांनीच या टीका महाराजांवर केल्या होत्या, कारण वर्षानुवर्षाच्या त्यांच्या एकाधिकारशाहीला महाराजांच्या या प्रयोगांमुळे तडे जाणार होते, जात होते. जातवार वसतिगृहांमुळे स्पृशा-स्पृश्यतेची समस्या कमी झाली. बहुजन विद्यार्थ्यांना अपमानास्पद वागणूक मिळणे कमी झाले. त्याचबरोबर विविध जातींचे बांधव आपल्या मुलांना आपल्या जातीसाठी असणाऱ्या वस्तीगृहांमध्ये शिकावयास पाठवू लागले. समाज जागृत होऊ लागला. परिणामी जातीयता कमी होऊ लागली. कला, क्रीडा, शेतकी, न्याय आदी विविध प्रकारचे शिक्षण या वस्तीगृहांमध्ये राहून मुलांना मिळू लागले. कोणतेही ज्ञान मिळविताना त्यांची जात आडवी येईनासी झाली. महाराजांनी जातवार वसतिगृहांचा केलेला हा प्रयोग प्रचंड प्रमाणात यशस्वी झाला. येथे मुळात महाराजांची जातवार प्रतिनिधित्वाची व्याख्या लक्षात घेतली पाहिजे.

"सर्व जातीचे लोक पुढे येऊन सामाजिक, औद्योगिक, शिक्षणविषयक, सरकारी नोकरी वगैरे सर्व बाबतीत आपआपली जबाबदारी पुरी पाडण्याचे सामर्थ्य त्यास येणे याला मी 'जातवार प्रतिनिधित्व' म्हणतो.मागे पडलेल्यांना अशा प्रकारे पुढे येण्यास उत्तेजन देणे हे माझे कर्तव्य आहे असे मी मानतो " [१२] आपण स्थापन केलेल्या जातवार वसतिगृहांचे समर्थन करताना महाराज म्हणतात,

"The evil of India is that each caste looks after its own people and they are indifferent to others.I, therefore encouraged the different castes, such as Marathas, Lingayats, Jains, Tailors, Goldsmiths, Mahomedans and the depressed classes,or Untouchables as they are called, to have their own hostels,There the boys are looked after by Superintendents of their own castes. They can study there free from the unhealthy influence of their homes."[१३]

भारतामध्ये प्रत्येक जात आपल्या स्वतःच्या जातबांधवांचीच काळजी घेते, आणि हे भारताविषयी अत्यंत वाईट आहे. प्रत्येक जात दुसऱ्या जातीबद्दल अजिबात विचार करीत नाही. म्हणून आपण संस्थानातील सर्व प्रजाजनांचा विचार करून त्या त्या जातीची वसतिगृहे स्थापन केल्याचे सांगून या वसतिगृहांमध्ये जे वसतिगृह अधीक्षक नेमलेले आहेत. ते त्यांच्याच जातीचे आहेत. आणि ते त्या विद्यार्थ्यांची काळजी घेतात. या ठिकाणी विद्यार्थी कोणत्याही प्रापंचिक अडीअडचणींशिवाय मुक्तपणाने अभ्यास करू शकतात अशा प्रकारचे विचार महाराजांनी मांडलेले आहेत.

आपल्या या धोरणाचे समर्थन करताना ते आणखी एके ठिकाणी म्हणतात कि, " I have shown Govt. in vedokta controversy how I broke down the passive resistance of Brahmins. That has taught me a lesson. This was a great stronghold of Brahminism. When I got powers there could be no functions at all such as giving public reception or a send off or a congratulatory, valedictory or farewell address to any man of note, official or non-official, and such other functions unless the Brahmins took the lead.Naturally therefore they were all in all and all had to curry their favour, their supremacy being unchallenged.I broke it down by encouraging the establishment of Boarding Institutes of different casts such as Marathas, Shenvis, Prabhus, Lingayats, Jains, Mahomedans, Daivadnas, Panchalas, Namdevs and even Mahars and by taking all these castes in my administration and the result is that the Brahmins lost their stronghold and all the leaders of these different castes have been asserting themselves in society."[१४]

संस्थानातील ब्राह्मणवर्गाच्या नेतृत्वाला आपल्या जातवार वसतिगृह चळवळीमुळे कशी खिळ बसली, याचे विवेचन महाराज करतात. सर्व क्षेत्रांमध्ये असणारी त्यांची मक्तेदारी विविध जातींच्या वसतिगृह स्थापनेला प्रोत्साहन देऊन मी कशी मोडून काढली आहे, आणि त्या त्या प्रत्येक जातींचे नवे नेतृत्व मी समाजामध्ये निर्माण करतो आहे. अशी आपली नवनेतृत्व निर्मितीची संकल्पना महाराज मांडतात.

आपल्या जातीचे हित-अहित प्रत्येक जात बांधवाला समजू लागले. त्या-त्या समाजातील गुणवंत,विचारी लोकांवर ज्या त्या समाजाच्या वसतिगृहाची जबाबदारी दिल्यामुळे समाजात ब्राह्मणांव्यतिरिक्त नवे नेतृत्व निर्माण होऊ लागले.संस्थानातील अधिकाराच्या जागा ब्राह्मणेतरांना मिळू लागल्या.एकंदरीतच ही योजना अधिक यशस्वी होऊ लागली. या वसतिगृह योजनेचे फलित सांगताना महाराज म्हणतात,

"As the creation of the Boarding Institution has destroyed the Brahmin leadership in social and other matters so the two Samaj movements are calculated to do away with their religious leadership."[१५]

वेदोक्त प्रकरणापासून कोल्हापुरामध्ये ब्राह्मण ब्राह्मणेतर असा संघर्ष वाढला होता.त्यामध्ये ब्राह्मण नेतृत्वाला सामाजिक आणि इतर क्षेत्रांमध्ये पर्याय देण्यासाठी राजांनी वसतिगृहे आणि ती ही 'जातवार वसतिगृहे' निर्माण करण्याचे धोरण आखले आणि या योजनेमुळे आपले इप्सित काहीसे साध्य झाल्याचे ही महाराज म्हणतात. शिक्षणापासून वंचित राहिलेल्यांना, मागासलेल्यांना महाराज एकाच 'शिक्षिताच्या' जातीचे मानत होते.या सर्वांमधील समान धागा शिक्षण हा होता, ते घेणाऱ्याची त्यांनी जात-पात पाहिली नाही. या उलट वंचित, मागास म्हणून संबोधल्या गेलेल्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी 'जातवार वसतिगृहे' उभारली. तत्कालीन भारतामध्ये अशा प्रकारचा शैक्षणिक प्रयोग दुसऱ्या कुठल्याही संस्थानिकांने किंवा ब्रिटिशांनी देखील केलेला नव्हता हेच या वसतिगृह चळवळीचे वेगळेपण होते.

**वसतिगृह योजनेची यशस्वीता -** आपल्या या वसतिगृह योजनेच्या यशस्वीतेबाबत महाराजांना खूप गौरव वाटत होता. दिनांक १५ एप्रिल १९२० रोजीच्या नाशिक येथील 'श्री उदाजीराव मराठा विद्यार्थी वसतिगृहा'च्या पायाभरणी समारंभावेळी ते अभिमानाने वसतिगृहांविषयी म्हणतात की,

" माझ्या चिमुकल्या राज्यातील प्रजाजनांनी एका बाबतीत तरी विशेष नाव कमावले आहे, हे मी अभिमानपूर्वक सांगतो. त्यांचे उदाहरण लोकांपुढे आल्याने हा कित्ता पुष्कळ ठिकाणी गिरविला गेला आहे. ब्रिटिश पार्लमेंटला 'मदर ऑफ पार्लमेंट्स' (Mother of Parliaments) असे मोठ्या अभिमानाने इंग्रजी व इतर लोक म्हणतात,त्याप्रमाणे कोल्हापुरास 'मदर ऑफ बोर्डींग हाऊसेस' म्हणजे विद्यार्थी वसतिगृहांची माता' असे सार्थ यश मिळाले आहे. तेथे मराठा,जैन, लिंगायत, सारस्वत, मुसलमान, दैवज्ञ, पांचाळ, शिंपी, कायस्थ प्रभू यांच्या मुलांकरिता विद्यार्थी वसतिगृहे आहेत. आर्य समाज सर्वांस सारखे लेखून गुरुकुल चालवीत आहे."[१६]

महाराजांच्या या कृतीच्या अनुकरणातून संस्थानाबाहेरही नाशिक येथे वसतिगृह स्थापन करण्यात आले होते. थोडक्यात शिक्षणातून समाज सुधारण्याचे हे लोण कोल्हापूर बाहेरही पसरत चालले होते. तसेच महाराजांच्या या शिक्षणविषयक कार्याची, वसतिगृह स्थापनेच्या अभिनव उपक्रमाची दखल सर जॉर्ज लॉईड या मुंबईच्या इलाख्याच्या गव्हर्नरने देखील आपल्या ३० जुलै १९१९ च्या कोल्हापूर भेटीवेळी घेतल्याचे दिसते. गव्हर्नर लॉईडने कोल्हापुरातील काही संस्थांना भेटी दिल्या तशा इथल्या वसतिगृहांनाही त्यांची भेट घडवून आणण्यात आली. लॉईड यांनी शाहू महाराजांनी सुरू केलेल्या वसतिगृहांबाबत गौरवोद्गार काढून सर्व वर्गाच्या,पंथांच्या,जातींच्या मुलांना शैक्षणिक संधी मिळण्यामध्ये या वसतिगृहांचा खूपच फायदा होईल, हे नमूद केले.[१७] मागासलेल्या, वंचित, जातधर्माच्या ओझ्याखाली दबल्या गेलेल्या वर्गाला आत्मोन्नती करण्याचा मार्ग शाहू महाराजांनी वसतिगृहांच्या रुपाने दाखवला होता. या वसतिगृहांमुळे कला, क्रीडा, समाजकारण, अर्थकारण, शैक्षणिक इत्यादी अनेक क्षेत्रांमध्ये बहुजन समाजातील नेतृत्व पुढे आले.सामाजिक समानता प्रस्थापित करण्यामध्ये या वसतिगृहांचा फार मोठा वाटा आहे हे नाकारून चालणार नाही.

**निष्कर्ष**

शिक्षण हेच बहुजन समाजाचा तरणोपाय आहे, त्यांच्या सामाजिक, आर्थिक प्रगतीमधील अडथळा हा अज्ञानीपणात आहे हे राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी ओळखले होते आणि म्हणूनच बहुजणांना शिक्षण देऊन त्यांच्यामध्ये आत्माभिमान जागृत करण्याचे कार्य महाराजांनी केले.

प्रजाजनांना फक्त शिक्षण देण्यापुरतेच आपले कर्तव्य मर्यादित नसून उचित शिक्षण घेण्यासाठी आवश्यक शैक्षणिक सोयी-सुविधांची निर्मिती करणे हे ही तितकेच महत्त्वाचे आहे हे त्यांनी जाणले.शाहुकालीन बहुजन समाजाची परिस्थिती पाहता बहुसंख्य समाज दारिद्र्याच्या खाईत खितपत पडला होता.त्यांना इच्छा असूनही परिस्थितीच्या रेट्यामुळे शिक्षण घेता येत नव्हते. पारंपारीक शेती व्यवसाय, त्यातून मिळणारे तुटपुंजे उत्पन्न, कर्जबाजारीपणा, जातीभेद, अज्ञान, दारिद्र्य इ.अनेक कारणे त्यांच्या शिक्षणातील प्रमुख अडथळे होते. प्रजेची,बहुजनांची नेमकी हिच अडचण शाहू महाराजांनी ओळखली आणि विद्यार्थ्यांसाठी सर्वसोयींनीयुक्त अशा जातवार वसतिगृहांची निर्मिती केली.योग्य शैक्षणिक साधने, सोयीसुविधा, संसाधने हि मानवाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्वाची असतात. प्रजाजनांनी शिकुन शिक्षित व्हावे, त्यांनी आपले हित-अहीत ओळखावे यासाठी अशी सर्व संसाधने वसतिगृहांच्या माध्यमातून पुरविण्याचे महत्वपूर्ण कार्य महाराजांनी केले.तो त्या काळातील एक अभिनव प्रयोग होता. जातवार वसतिगृहांच्या निर्मितीमुळे बहुजन समाजातील मुले शिकु लागली.शिक्षणानेच पिढ्यानपिढ्याचे दैन्य दूर करता येते हे ओळखू लागली.शिक्षक, तलाठी, वकील, संस्थानी अधिकारी अशा महत्वाच्या पदांवर बहुजन विद्यार्थी दिसू लागले.विशिष्ट वर्गाची शिक्षण, नोकऱ्या यातील मक्तेदारी संपुष्टात येऊ लागली.एक फार मोठा सामाजिक बदल समाजामध्ये दिसू लागला.धार्मिक, सामाजिक गुलामगिरीतून समाज मुक्त होऊ लागला.शाहू महाराजांनी सुरू केलेल्या या वसतिगृह चळवळीचे हे महत्वपूर्ण वैशिष्ट्य होय.पुढे या चळवळीचे लोण महाराष्ट्रभर पसरू लागले आणि या वसतिगृहांमध्ये राहून शिक्षण घेऊन शिक्षित झालली पिढी समाजाला दिशा देण्याचे कार्य करु लागली.आजही हि चळवळ टिकून आहे,याचे सर्व श्रेय राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना जाते.

**संदर्भ सूची**

१) Report on the General Administration of the Kolhapur State For the Year 1893-94, Part-II, Chapter- I (Political), Page No- 4.

२) Dr. Vilas Sangave, Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vol - II (1894-1900 A.D.), Page No - 43.

३) Report on the General Administration of the Kolhapur State For the Year 1896-97, Chapter - VII, Instruction, Page No -103.

४) डॉ. जयसिंगराव पवार (संपादक), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, द्वितीयावृत्ती २००७, पान नं - ६४

५) Report on the General Administration of the Kolhapur State For the Year 1896-97, Chapter - VII, Instruction, Page No -103.

६) धनंजय कीर, राजर्षी शाहू महाराज, पॉप्युलर प्रकाशन ,चौथे पुनर्मुद्रण २०२०/१९४१, पान नं - ११२

७) दि.१३ एप्रिल १९११ रोजीचे शाहू महाराजांचे म.मॉरिसन यांना पत्र, कोल्हापूर पुरालेखागार कोल्हापूर, पत्र क्र.R-4123.

८) कृ.गो.सूर्यवंशी, राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पहिली आवृत्ती फेब्रु.१९८४, पान नं - १३१.

९) उपरोक्त, सूर्यवंशी,पान नं - १३७.

१०) डॉ.गणपतराव सूर्यवंशी, राजा शाहू आणि समाज प्रबोधन, रणजित प्रकाशन,पान नं - ४३,४४.

११) डॉ.जयसिंगराव पवार (संपादक), राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे, मेहता पब्लिशिंग हाऊस मार्च २०१८, पान नं - १०३.

१२) प्राचार्य रा.तु. भगत, राजर्षी शाहू : शिक्षण विषयक विचार आणि कार्य, चैतन्य प्रकाशन, प्रथमावृत्ती १७ जून १९८१, पान नं - ७८.

१३) Dr.Vilas Sangave,Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vol - III (1918-1919 A.D.), Page No - 530.

१४) IBID, Latter No - 7,Page No - 9.

१५) IBID, Letter No - 7,Page No - 10.

१६) डॉ.जयसिंगराव पवार (संपादक), राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे, मेहता पब्लिशिंग हाऊस मार्च २०१८, पान नं - ५९.

१७) Dr.Vilas Sangave, Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vol - III (1918-1919 A.D.), Page No - 533.